Pune News - पुणे बातम्या

# १४ सायबर सुरक्षा सत्रांतून विद्यार्थ्यांमध्ये ऑनलाईन सुरक्षिततेची जागृती



५वी ते १२वी तसेच वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन

१४ सायबर सुरक्षा सादरीकरणे २८००+ विद्यार्थ्यांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश

पुणे : डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर लक्षात घेता विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा आणि सुरक्षित ऑनलाईन वर्तनाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी Quick Heal Foundation यांच्या 'Cyber Shiksha for Cyber Suraksha' या उपक्रमांतर्गत विविध शैक्षणिक संस्थांमध्ये सायबर जागृतीपर सत्रांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत आतापर्यंत एकूण १४ सायबर सुरक्षा सादरीकरणे घेऊन २८०० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश पोहोचवण्यात आला. विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार सायबर सुरक्षेचे विषय सोप्या, समजण्यासारख्या आणि संवादात्मक पद्धतीने मांडण्यात आले.

### या सत्रांमध्ये मार्गदर्शन करण्यात आलेले प्रमुख विषय

- फिशिंग
- बनावट लिंक
- OTP फसवणूक
- मजबूत पासवर्ड
- सोशल मीडिया सुरक्षितता
- वैयक्तिक माहितीचे संरक्षण
- ऑनलाईन अनोळखी व्यक्तींपासून सावधगिरी
- डिजिटल फूटप्रिंट
- AI व Deepfake
- ऑनलाईन फसवणूक
- सुरक्षित स्मार्टफोन वापर

विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी Emoji Activity, प्रश्नमंजुषा, 'Find the Mistake', Rapid Fire आणि परिस्थितीवर आधारित प्रश्न अशा विविध उपक्रमांचा वापर करण्यात आला.

**Cyber Warriors**
हर्षिता मुलजकर आणि सिद्धी सगरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर सुरक्षेचे महत्त्व समजावून सांगितले.

“ 'सावध रहा, विचार करा आणि मगच क्लिक करा' हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. सुरक्षित डिजिटल सवयी आत्मसात करून विद्यार्थ्यांनी ऑनलाईन जगाचा जबाबदारीने वापर करावा, यासाठी हा सत्रांद्वारे प्रयत्न करण्यात आले. ”

या उपक्रमासाठी के. बी. जोशी इस्स्टिट्यूट ऑफ इम्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या प्राचार्या डॉ. अनधा वैद्य, HOD प्रा. रुपाली सराफ तसेच शिक्षक समन्वयक प्रा. मनाली सापकाळ यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## शिका • जागरूक व्हा • सुरक्षित राहा